  




# आर.टी.ई. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२१-२०२२

## F.A.Q. (वारंवार विचारण्यात येणारे/उदभवणारे प्रश्न)

१) अ) २५% ऑनलाईन प्रवेशासाठी कोणती बालके पात्र आहेत ?

**उत्तर:-** दुर्बल घटकांतर्गत ज्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.एक लाखापर्यंत आहे अशा पालकांची बालके,वंचित गटांतर्गत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, आणि सर्व जाती धर्मातील विकलांग बालके.

१) ब) वंचित गटामध्ये आणि दुर्बल गटामध्ये कोणत्या बालकांचा समावेश होतो ?

**उत्तर:- वंचित गटामध्ये** अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,व दिव्यांग बालकांव्यतिरिक्त वि.जा.(अ),भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती(क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग (OBC),विशेष मागासवर्ग (SBC), एच. आय. व्ही. बाधित/एच. आय. व्ही. प्रभावित बालके यांचा समावेश आहे.

**दुर्बल गटामध्ये** ज्या बालकांच्या पालकांचे /ज्या बालकांचे पालन पोषण करणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न १ लाखाच्या आत आहे अशा बालकांचा सामावेश आहे.

SEBC प्रवर्गाच्या बालकांना आर्थिक दुर्बल(१ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या ) गटामधून प्रवेश अर्ज भरता येईल.

२) कोणत्या प्रकारच्या शाळा प्रवेशासाठी पात्र आहेत?(माध्यम व बोर्ड)

**उत्तर-** सर्व माध्यमाच्या,सर्व बोर्डाच्या(राज्यमंडळ,सी.बी.एस.ई.,

आय.सी.एस.ई.व आय.बी.सह) विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित स्वयं अर्थसहाय्यित प्राथमिक सर्व शाळा जेथे वर्ग १ ली किंवा पूर्व प्राथमिक स्तरावरील आहे. (मदरसा, मक्तब, धार्मिक पाठशाळा,अल्पसंख्यांक शाळा वगळून)

३) पालकांना अर्ज केव्हा करता येईल?

**उत्तर**- सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी ठरवून दिलेल्या कालावधी मध्येच अर्ज करता येईल.

४) पालकांना सन २०२१-२०२२ या वर्षात -ऑनलाईन अर्ज किती वेळा भरता येईल?

**उत्तर**- पालकांना सन२०२१-२०२२ या वर्षात प्रवेशासाठी फक्त एकदाच अर्ज भरता येणार आहे.

५) अर्ज कोठून भरावा लागेल?

**उत्तर**- मदत केंद्रांवर किंवा जेथे इंटरनेट सुविधा, संगणक ,प्रिंटर इ. उपलब्ध असेल तेथून भरावा.

६) अर्ज भरताना कोणती कागदपत्र अपलोड करावीत ?

**उत्तर**:- अर्ज भरताना कोणतेही कागदपत्रे अपलोड करायची नाहीत. मात्र ऑनलाईन अर्ज भरताना पुढील कागदपत्रे जवळ असणे आवश्यक आहे.

१) अर्जामध्ये जो रहिवासी पुरावा सादर करणार आहेत तोच रहिवासाचा पुरावा. (रहिवासी पुराव्यावरीलच पत्ता अर्जावर लिहावा )

२) बालकाचे जन्म दिनांकाची नोंद करण्यासाठी जन्माचा दाखला.

३) बालक वंचित घटकातील असल्यास जातीची नोंद करण्यासाठी जातीचे प्रमाण पत्र.

४) बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकांच्या वडिलांचा उत्पन्नाचा दाखला (आर्थिक वर्ष सन २०२०-२१) सदरच्या उत्पन्नाच्या दाखल्यावरील बारकोड number ऑनलाईन अर्जावर भरल्याशिवाय अर्ज पूर्ण करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच लॉटरी लागल्यास शाळा प्रवेशाच्या वेळेस सर्व आवश्यक कागद पत्रे, असणे आवश्यक आहे अन्यथा मिळालेला प्रवेश रद्द होऊ शकतो याची नोंद घ्यावी.

७) २५% ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याचीवेब-साईटकोणतीआहे?

**उत्तर**- १)सदरचा अर्ज rte25admission.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (वेब-साईटवर) ऑनलाईन भरावयाचा आहे.

८) प्रवेश अर्जाला किती शुल्क आहे?

**उत्तर**- शैक्षणिक वर्ष सन ची २५ २०२१-२०२२ % ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे अर्ज मोफत स्वरुपात संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलबध असून वरील संकेत स्थळावर (वेब साईटवर )जावून भरावयाचा आहे.

९) पालक किती शाळा व कोणत्या माध्यमासाठी अर्ज करू शकतात?

**उत्तर**- ऑनलाईन माहिती भरताना पालकांना त्यांच्या रहिवासी क्षेत्रापासून १ कि.मी.व ३ कि.मी. आणि अधिक अंतरापर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या शाळांपैकी जास्तीत जास्त कोणत्याही १० शाळांचे पर्याय निवडता येतील.तसेच उपलब्ध सर्व माध्यमातून शाळेचे माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना राहील.

१०) शाळेपासून किती कि.मी. अंतरातील रहिवासी अर्ज करू शकतात?

**उत्तर**- पालकांना पाल्याच्या निवास स्थानापासून १ कि.मी.,३ कि.मी. अथवा अधिक अंतरावरील सर्व शाळांचा समावेश करता येईल मात्र शाळेपासून १ कि.मी. परिसरातील अर्जदारांना नियमाने प्राधान्य मिळेल. १ कि.मी. परिसरातील पुरेशा क्षमतेइतकी बालके उपलब्ध न झाल्यास ३ कि.मी.आणि त्या पेक्षा अधिक अंतराच्या परिसरातील बालके संबधित शाळेत प्रवेशास पात्र होतील. मात्र ३

कि.मी पेक्षा अधिक अंतराच्या शाळेकरिता लॉटरी लागली तर त्या वेळेस विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा खर्च संबधित पालकास करावा लागेल.

११) अर्ज केला म्हणजे खात्रीशीर प्रवेश मिळेलच का?

**उत्तर-** शाळेच्या आरंभीच्या वर्गाच्या २५ % प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सोडत/लॉटरी पद्धतीने प्रवेश दिले जातील. अशा परिस्थितीत प्रत्येक अर्जदाराच्या पाल्याला प्रवेश मिळेलच असे नाही.

१३) दिव्यांग बालकाच्या प्रवेशाचे निकष व आवश्यक कागदपत्रे कोणती?

**उत्तर-** सर्व जाती धर्मातील दिव्यांग बालके प्रवेशास पात्र.दिव्यांग असल्याचे प्रमाण पत्र ४०% पेक्षा अधिक असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकीय अधीक्षक यांचे प्रमाणपत्र,जन्माचादाखला,रहिवासीपुरावा(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/वीजबिल टेलिफोनबिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना, भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत / यापैकी कोणतेही एक)

१४) घटस्फोटीत महिलांच्या बालकांसाठी आवश्यक कागदपत्रे कोणती?

उत्तर :-1)न्यायालयाचा निर्णय.२)घटस्फोटित महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.

३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१५)न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिलांच्या बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

उत्तर :-1)घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा.२)घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा. ३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१६) विधवा महिलेच्या बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

**उत्तर** :-1)पतीचे मृत्यूपत्र. २) विधवा महिलेचा /बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा. ३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

१७) अनाथ बालकांसाठी आवश्यक कागद पत्रे कोणती?

**उत्तर** :-1)अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.

२)जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील.

३) पालकांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना single parent पर्याय निवडला असेल तर संबधित बालकाचे पालकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीचे प्रवेशासाठी लागणारे आवश्यक कागद पत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.

१८) खुला प्रवर्ग,अल्पसंख्यांक,यांना प्रवेशासाठी कोणकोणती कागदपत्रे/प्रमाणपत्रे आवश्यक आहेत?

**उत्तर-** जन्माचादाखला,रहिवासी,पुरावा,(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र ,वीज बिल /टेलिफोन बिल/पाणी पट्टी/घर पट्टी/वाहन चालविण्याचा परवाना / रेशनिंग कार्ड,/ गॅस कार्ड/ बँक पासबुक/ भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत यापैकी कोणतेही एक)

व कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.एक लाखापेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला.

१९) उत्पन्नाचा दाखला आणि जातीचा दाखला कोणत्या ठिकाणचा पाहिजे ?

**उत्तर:- उत्पन्नाचा आणि जातीचा दाखला परराज्यातील ग्राह्य धरण्यात येणार नाही .ज्या ठिकाणी वास्तव्य आहे त्याच ठिकाणचा असावा.**

२०) जन्माचा दाखला/प्रमाणपत्र कोणते पाहिजे?

**उत्तर-** आर.टी.ई. अधिनियम २००९ मधील भाग ४ मधील नियम ९ नुसार कलम १४ च्या प्रयोजनार्थ वयाचा पुरावा म्हणून स्वीकार करण्याजोगे दस्तऐवज:- जेथे जन्म व मृत्यू अधिनियम १९६९ (१९६९ चा १८)अन्वये जन्माचा दाखला उपलब्ध नसेल तेथे पुढील दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज हा शाळांमध्ये प्रवेश घेण्याच्या प्रयोजनासाठी बालकाच्या वयाचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

अ) बालकाच्या जन्म ठिकाणच्या संबधात किंवा सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका यांनी केलेली नोंद किंवा ठेवलेला अभिलेख.

आ) अंगणवाडी अभिलेख

ई) हा अभिलेख उपलब्ध नसेल तर, वंचितगटातील तसेच दुर्बल घटकांतीबालकाच्या बाबतीत जन्मदिनांक नमूद करणारे बालकाच्या एकतर मातेचे किंवा पित्याचे प्रतिज्ञापत्र,गावच्या सरपंचाने किंवा स्थानिक शाळेच्या मुख्याध्यापकाने किंवा शहरी वा निमशहरी क्षेत्राच्या बाबतीत शासनाने या संबधात अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले आई-वडिलांचे किंवा पालकांचे बालकाच्या वयाचे प्रतिज्ञापत्र.

स्पष्टीकरण:-_अशा बाबतीत बालकाला शाळेत प्रवेश देणाऱ्या अधिकाऱ्याहून वरिष्ठ दर्जाचा अधिकारी, जन्माच्या दाखल्याऐवज स्वीकारकरण्याजोगे बालकाचे इतर दस्तऐवज हे वस्तुत: उपलब्ध नाहीत किंवा वस्तुत: मिळू शकत नाहीत याची खातरजमा करतील.

२१) जात विषयक कोणता पुरावा ग्राह्य धरावा?

**उत्तर-** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी असलेला जात विषयक पुरावा ग्राह्य धरावा. परराज्यातील जातीचे प्रमाण पत्र ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

२२) आर.टी.ई.२५% ऑनलाईन प्रवेशा करिता उत्पन्नाचा दाखला कोणत्या वर्षाचा पाहिजे?

**उत्तर-** उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चा पाहिजे.

२३) कोणत्या अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरता येईल?

**उत्तर-** उत्पन्नाचा दाखला किमान तहसीलदार दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेला असावा.पर राज्यातील उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरण्यात येणार नाही

२४) गुगलच्या नकाशात रहिवासाचे (घराचे)स्थान निश्चित करताना कोणती काळजी घ्यावी?

**उत्तर-** आपल्या स्वत:च्या घराचे स्थान निश्चित करताना रहिवासी पुराव्यावरील पत्ता पाहूनच नकाशात स्थान निश्चित करावे.

२५) पालक गुगलमॅपवर अचूक नोंद करण्यासाठी इतर साधनांची मदत घेऊ शकतील का?

उत्तर- घराचे व शाळांचे अचूक Latitude व Longitudeमोजण्यासाठी गुगलवर प्लेस्टोअरवर पुढील ॲप्स (Apps) आहेत.

१)my current location

२) Sea level

३) Address 2 lat.lon.

४) Latitude and longitude

५) Latitude coordinates

६) Gpslat long viewer

७) Latitude tracker

८) Latitude and longitude match

९) Gps coordinates

२६) शाळा निवडताना कोणती काळजी घ्यावी?

**उत्तर** शाळा निवडताना आपल्या रहिवासाचे ठिकाण आणि शाळा यातील हवाई अंतर (Aerial Distance ) प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याने रस्त्याने शाळा व घर यातील प्रत्यक्ष अंतरात फरक पडू शकतो त्यामुळे शाळा निवडताना दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे.

२७) प्रवेशाची कार्यपद्धती कशी असेल?

**उत्तर**-शाळेच्या प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सोडत/लॉटरी काढून प्रवेश निश्चित केले जातील व शाळेच्या प्रवेश क्षमतेपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास, प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सर्व पात्र अर्जदारांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.

२८) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाबाबतची पुढील कार्यवाही पालकांना कशी कळणार?

**उत्तर**- याबाबत पालकांना अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.(msg)द्वारे सूचित केले जाईल. त्यामुळे अर्जात दिलेला मोबाईल क्रमांक अर्जदारांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतसुरक्षित ठेवणे गरजेचे आहे.परंतु पालकांनी फक्त एस.एम.एस(msg)वर अवलंबून राहू नये . आर.टी.ई. पोर्टल वर

Application wise details या tab वर क्लिक करून आपला अर्ज क्रमांक लिहून अर्जाची स्थिती पहावी.

२९)प्रवेश मिळाल्याचे अर्जदारास कसे कळेल?

**उत्तर-** सोडत/लॉटरी झाल्यानंतर याबाबत पालकांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे सूचित केले जाईल. परंतु पालकांनी फक्त एस.एम.एस(msg)वर अवलंबून राहू नये. आर.टी.ई. पोर्टल वर Application wise details या tab वर क्लिक करून आपला अर्ज क्रमांक लिहून अर्जाची स्थिती पहावी.

३०) प्रवेशासाठी निवड झाल्यानंतर प्रवेश कसा घ्यावा?

**उत्तर-** प्रवेशासाठी निवड झाली आहे असा msg प्राप्त झाल्यानंतर rte पोर्टल वरील Application wise details या tab वर क्लिक करून आपला अर्ज क्रमांक लिहून अर्जाची स्थिती पहावी लॉटरी लागली असेल तर allotment letter ची प्रिंट काढावी आणि हमीपत्र या या tab वर क्लिक करून त्याची प्रिंट काढावी.

Allotment letter वर आपल्या विभागात पडताळणी समितीचा पत्ता (address) दिलेला असेल त्या ठिकाणी allotment letter, हमी पत्राची प्रिंट आणि आवश्यक कागदपत्रे घेऊन जावे आणि आपला प्रवेश निश्चित झाल्याची प्रिंट पडताळणी सामितीकडून घ्यावी

निवड झालेल्या बालकाने विहित मुदतीत पडताळणी समितीकडे जाऊन प्रवेश निश्चित न केल्यास ती जागा रिक्त राहील आणि त्या जागेवर लॉटरी द्वारा निवड झालेल्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यास अनुक्रमे संधी मिळेल .

३१) आर.टी.ई २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रीये अंतर्गत प्रवेश मिळाला अथवा नाही हे कसे समजेल?

**उत्तर** :- प्रवेशासाठी निवड झाली आहे असा msg प्राप्त झाल्यानंतर पडताळणी समितीकडे जाऊन प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे सबमिट केल्यावर त्यांना पडताळणी समितीकडून रसिट(Receipt) पावती दिली जाईल. आणि प्रवेश मिळालाअथवा नाही ते समजेल .

३२)आर.टी.ई २५ % अंतर्गत शाळेत प्रवेश मिळाल्यावर स्थलांतर, बदली अथवा अन्य कारणाने आर.टी.ई मध्येच शाळा बदलून मिळेल का?

**उत्तर** :- आर.टी.ई २५ % अंतर्गत एका शाळेत प्रवेश मिळाल्यावर कोणत्याही कारणास्तव शाळा बदलून मिळत नाही.

टीप:- आर.टी.ई. २५ % online प्रवेशाकरिता लागणारी सर्व कागदपत्रे ही पालकांनी online प्रवेश अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतचीच असावीत त्यानंतरची कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

